आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र – दु. 1.45 वाजता
18 मार्च, 2018 – रविवार

राज्यात आज सर्वत्र चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा साजरा होत आहे. राष्ट्रपती रामनाथ कोविंद, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल चे विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. हे नूतन वर्ष सर्वांकरता सुख, शांती, समाधान आणि संपन्नता घेऊन येवो, असं राज्यपालांनी म्हटलं आहे, तर मुख्यमंत्र्यांनी, आपल्या शुभेच्छा संदेशात, मराठी भाषा, साहित्य आणि सांस्कृतिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी शासन वचनबद्ध असल्याचं, म्हटलं आहे.

दरम्यान, नववर्षारंभानिमित्तानं आज सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईसह राज्यातल्या विविध शहरात शोभायात्रा काढून नववर्षाचं स्वागत केलं जात आहे. मुंबईतल्या गिरगाव, दादर, ठाणे, डोंबिवली,अंबरनाथ तसंच नाशिक शोभायात्रा काढण्यात आल्या होत्या. शोभायात्रेत महारांगोळी काढून तसंच गुढीपुजन करुन ढोलपथकाच्या गजरात आबालवृद्ध सहभागी झाले होते. घरोघरी दारावर गुढ्या उभारुन नववर्षाचं स्वागत केलं जात आहे. सम्राट शालिवाहनाची राजधानी असलेल्या पैठण शहरात तसंच औरंगाबाद इथंही शहराचं ग्रामदैवत असलेल्या संस्थान गणपतीपासून शोभायात्रा काढण्यात येणार आहे. अलिबाग येथे हिंदू नववर्ष स्वागत समितीच्यावतीने राम मंदिरापासून पारंपारिक वेषभूषा करून शोभायात्रा काढण्यात आली होती. रत्नागिरीच्या जनसेवा ग्रंथालयानं साहित्यीक गुढी उभारुन नववर्षाचं स्वागत केलं. गोंदिया जिल्हा परिषदेतर्फे गुढीपाडवा शाळा प्रवेश वाढवा ही मोहिम राबवण्यात येत आहे.

<><><>

राज्यात आजपासून प्लास्टिक आणि थर्माकोलच्या वस्तूंच्या वापरावर बंदी घालण्यात येणार आहे. प्लास्टिक आणि थर्माकोल बंदीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर जास्तीत जास्त २५ हजार रुपयांपर्यंत दंड आणि ३ महिन्यांच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

एकदाच वापरण्यासारख्या वस्तू म्हणजेच ताटं, कप, थाळ्या, पेले, चमचे, स्ट्रॉ, वाटी, यांचा वापर, वितरण घाऊक आणि किरकोळ विक्री आणि वाहतूक करायला संपूर्ण राज्यात बंदी असणार आहे.

<><><>

दहशतवाद विरोधी पथकानं काल पुण्यातून तीन बांगलादेशी नागरिकांना अटक केली. बांगलादेशमधल्या अन्सारउल्लाह बांग्ला टीम दहशतवादी संघटनेच्या कार्यकर्त्यांना या लोकांनी आश्रय दिल्याचा त्यांच्यावर संशय आहे. वानवडी भागात ते बेकायदेशीररित्या राहात होते. त्यांच्याकडे बनावट कागदपत्रेही सापडली आहेत. या तिघांना २९ मार्च पर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

<><><>

जम्मू काश्मीर मध्ये पूंछ जिल्ह्यात मेंढरमध्ये पाकिस्तानी सैन्यानं केलेल्या उखळी तोफांच्या माऱ्यात एकाच कुटुंबातले पाचजण मारले गेले. सकाळी सात वाजून चाळीस मिनिटांनी बालाकोट विभागात पाकिस्तानी सैन्याने नागरी वस्ती तसंच इतर भागांवर उखळी तोफांचा वर्षाव सुरु केला असल्याचं संरक्षण सूत्रांनी आकाशवाणीला सांगितलं. देवटा गावात एका घरावर पडलेल्या बॉम्बमुळे घरातले पाच जण ठार झाले, तर दोन मुली गंभीर जखमी झाल्या. भारतीय सैन्य हल्ल्याला जश्यास तसे उत्तर देत आहे.

<><><>

पारंपरिक शेतीतून खर्च मोठ्या प्रमाणावर होत असल्यानं कारणाने जिल्हयातील शेतकऱ्यांनी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली पाहिजे,तसंच नगदी पिकाचं उत्पादन घ्यायला हवं,असं मत जिल्हाधिकारी एम.डी. सिंह यांनी केले.

कृषि विभाग, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी यांच्या संयुक्त विद्यमानं अंबाजोगाई इथं आयोजित बीड जिल्हा कृषि महोत्सव 2018 चं उद्घाटन आमदार संगिता ठोंबरे, यांच्या हस्ते संपन्न झाले त्यावेळी ते बोलत होते.

या कृषि महोत्सवात विविध प्रकारचे जवळपास 200 स्टॉल उभारण्यात आले असून या ठिकाणी शासनाच्या सर्व विभागाच्या स्टॉल मधून त्या त्या विभागाची योजनांची माहिती शेतकऱ्यांना मिळणार आहे.

जलयुक्त शिवार अभियानातून जिल्हयात मोठया प्रमाणात जलसंधारणाची कामे करण्यात आली असून त्याचा लाभ शेतकऱ्यांना झाला आहे. असंही जिल्हाधिकारी म्हणाले.

**<><><>**

नोटबंदीच्या 36 तासात गोंधळ उडाला होता. मात्र निर्माण झालेली परिस्थिती हाताळण्यात आम्ही यशस्वी झालो. नव्या नोटा हाती आल्यानंतर त्या तातडीने स्टेट बॅंकेच्या 22 हजार शाखांमध्ये तसेच इतर बॅंकांमध्ये पोचविल्या असे प्रतिपादन स्टेट बॅंकेच्या माजी अध्यक्षा अरुंधती भट्टाचार्य यांनी केले. त्यांच्या तसेच सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांच्या हस्ते उद्योग क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या उद्योगांना गौरविण्यात आले. कॉन्सिल फॉर फेअर बिझिनेस प्रॅक्टीस (सीआरबीपी) यांच्या वतीने 30 वा सीएफबीपी जमनाबाब बजाज पुरस्कार उद्योग क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या उद्योगांना काल प्रदान करण्यात आले. यावेळी सीएफबीपीच्या अध्यक्षा कल्पना मुन्शी, विनित भटनागर आदी यावेळी उपस्थित होते. नोटबंदीनंतरचे काही तास आमच्यासाठी कसोटीचे होते. नोटबंदीच्या घोषणेनंतर दुसऱ्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्याने अडचणीत भर पडली होती. मात्र त्या कसोटीच्या काळातही आम्ही केलेले व्यवस्थापन यशस्वी झाले, असेही भट्टाचार्य म्हणाले. माजी न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांनी उद्योग क्षेत्रात योगदान देणाऱ्या उद्योगांचा आणि संस्थांचा गौरव केला.

**<><><>**

ग्वाल्हेर इथे महिला क्रिकेट आंतरराष्ट्रीय मालिकेतील तिसरा  आणि अंतिम सामना आज भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळला जाणार आहे. सामना सकाळी 9 वाजता सुरु होणार आहे.

ऑस्ट्रेलियात पहिला सामना 8 गडी राखून तर दूसरा सामना 60 धावांनी जिंकला. भारतीय संघाच्या कर्णधारपदी मिताली राज आणि ऑस्ट्रेलियाच्या कर्णधारपदी मेग लेनिंग आहेत.

**<><><>**

तीन देशातील टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतील अंतिम सामना आज भारत आणि बांग्लादेश यांच्यात रंगणार आहे. कोलंबो इथल्या प्रेमदासा स्टेडियमवर आज संध्याकाळी 7 वाजल्यापासून हा सामना खेळला जाणार असून, या मैदानावर भारतानं खेळलेल्या 8 सामन्यांपैकी 7 सामने जिंकले आहेत. भारतानं या मालिकेत सलग 3 विजय मिळवले असून, बांग्लादेशानं श्रीलंकेला रोमांचक सामन्यात पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

**<><><>**

मुंबई आणि आसपासच्या भागात आज सकाळपासून ढगाळ वातावरण आहे. उद्या सकाळपर्यंत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. कोकण आणि विदर्भात प्रामुख्यानं हवामान कोरडं राहिल.

**//<><><><>//**